# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ: रासेयो/६१८/१३

दि. १८ फेब्रुवारी २०१३

प्रति

मा. प्राचार्य /रासेयो कार्यक्रम अधिकारी
पुणे, अहमदनगर व नाशिक
रासेयो संलग्नीत महाविद्यालये

विषय : 'प्लस पोलिओ अभियान' बाबत...

महोदय,

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) ठरविल्यानुसार दि. २० फेब्रुवारी २०१३ व दि. २४ फेब्रुवारी २०१३ या दोन दिवस 'प्लस पोलिओ अभियान' राबविण्यात येणार आहे. तरी पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांना या अभियानात सामील करून घेवून शासनाला सामाजिक कार्य म्हणून सहकार्य करावयाचे आहे. यामध्ये स्थानिक प्राथमिक रूग्णालये, प्राथमिक शाळेमधील पोलिओ बुथ, पोलिओ लसीकरणासाठी कार्यरत असणाऱ्या सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येते.

त्यानुसार रासेयो स्वयंसेवकांनी वरीलप्रमाणे पोलिओ बुथवर जावून पोलिओ लसीकरण अभियान यशस्वी करणेकरीता सहकार्य करावे. तसेच महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी ग्रामीण व शहरी भाग, स्थानिक प्राथमिक शाळा याठिकाणी संघाने जावून जावून पोलिओ लसीकरणाच्या बाबतीत जनजागृती करावी. अशाप्रकारे विद्यार्थ्यांची येणारी भावी पिढी ही निरोगी व सुदृढ असावी या हेतूने सामाजिक कार्यातून 'पोलिओ लसीकरण अभियान' यशस्वी होणेकरीता रासेयोच्या माध्यमातून शासनाला सहकार्य करावे तसेच 'पोलिओ लसीकरण अभियान' मध्ये सहभागी विद्यार्थ्यांची यादी व अहवाल महाविद्यालयाने रासेयो कार्यालयास पाठवावा ही विनंती.

कळावे, धन्यवाद!

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना